औद्योगिक सुरक्षा व
आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय
कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१.
फोन नं. २६५७२५०४/०९/२२/५८, Email- dirdish.mum-mh@gov.in Website-www.mahadish.in

---

क्र.संऔसुवआ/अपघात/सुलेप/ ७५५८ /७,
दिनांक : 16 JUL 2024

# जाहीर निवेदन

विषय-महाराष्ट्र कारखाने ( सुरक्षा लेखा परीक्षण ) ( सुधारणा ) नियम, २०२४ बाबत.

शासन अधिसूचना क्र. एफएसी-२०२३/प्र.क्र.५२(भाग-२)/कामगार-४, दिनांक १९ जून, २०२४ अन्वये महाराष्ट्र कारखाने ( सुरक्षा लेखा परीक्षा ) नियम, २०१४ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या असून सुधारीत नियम प्रसिध्द झालेले आहेत.

सदर नियमांमधील नियम ६ (१) नुसार सुरक्षा लेखा परीक्षक म्हणून मान्यता मिळण्याकरीता इच्छुक पात्र अर्जदारांनी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी ते मार्च आणि जुलै ते सप्टेंबर या दरम्यान नमुना- अ मध्ये ( व्यक्तीकरीता ) व नमुना- ब मध्ये ( संस्थेकरीता ) एक हजार रुपये इतक्या परीक्षा शुल्कासह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१, यांचकडे द्विप्रतीत अर्ज सादर करावा.

सदर अर्जाकरीता असलेले परीक्षा शुल्क संचालनालयाच्या "०२३० - कामगार व सेवायोजन, १०४ कारखाने अधिनियमांतर्गत जमा होणारे शुल्क (०० ) (०३) प्रमाणक शल्यचिकित्सकांची नोंदणी व नुतनीकरण शुल्क ( ०२३००२४१ ) या लेखाशिर्षाखाली ग्रास प्रणालीमार्फत संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे नावे भरुन त्याच्या चलनाची प्रत अर्जासह जोडण्यात यावी.

( दिपक पोकळे )
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.